गारीनें सहज प्राप्त होतो. रस्त्याच्या फूटपायरीवर ज्योतिषी पंचांग घेऊन बसतो. एक आणा दिला म्हणजे लाभ सांगतो. राहू, केतू दोन्ही तुझ्या राशीला आले आहेत, त्यांची पूजा केली पाहिजे, त्यासाठीं अनुष्ठान केलें पाहिजे, १। रुपया पाहिजे. वेळ गेला, एक आणा गेला, सव्वा रुपयावर गंडांतर आलें! त्याला लाभ न होतां नुकसानच येतें. या अशा फुटपायरीवर बसणाऱ्या ज्योतिषाला लाभ कशांत आहे, हें नक्की माहित असतें तर ते फुटपायरीवर बसलेच असते कशाला ? ते तर राजे झाले असते. परंतु लाभ हा सर्वस्वी आपआपल्या कर्तबगारीवर अवलंबून आहे. भक्तिभावानें सर्व लोकांस करून उद्योगास लावले तर, जे जे लाभ मागाल ते ते लाभ तुम्हांला आपोआप मिळतील. माझाच पुरावा घ्याना! घरीं असतांना आम्हीं तिघें—आई, कुटुंब, मी व दोन मुलें दिवसभर काम करून दुपारीं घरीं येत असूं. मग दोन घांस खाऊन बाजार करण्यास तीन मैल जावें लागत असे. बाजार करण्यास जवळ फक्त आठ आणे, त्यांत काय घ्यावें ? सर्व बाजार फिरून विचारावे. कांदे सहा आणे, वांगीं आठ, आठ आणे, त्या आठ आण्यांत काय घ्यावें ही पंचाईत पडे. पण आज त्या सर्व वस्तू एका ईश्वराच्या भजनाच्या लाभानें मिळाल्या. नको म्हणत असतांहि सर्व प्राप्त झाले. असा नामाचा प्रताप आहे.

एकदां आजारी पडलो. खेडेगांव—ना वैद्य, ना डॉक्टर. प्रथम जोरांत थंडी वाजून आली. घरांत एकटाच. कसा तरी दम धरून राहिलो. थंडी कमी झाली आणि ताप भरला. सोस लागून लागून तहान लागली. पाणी कोणी देईल? खेड्यांत घराच्या बाहेर सपरीत पाण्याचे रांजण भरून ठेवलेले असतात. त्यावर झांकण नसते—कुत्रीं, मांजरे, कावळे—जनावरें त्यांत तोंड घालतात-असें पाणी पण उठून घ्यावे लागणार होते. पाण्याच्या तगमगीने मोठ्या कष्टानें उठलो. घरांतून बाहेर आलो. अंगावर कपडा नाहीं. घेतले पाण्याचे गडवे आणि तोंडाला लावून घटाघटा पाणी प्यालो. पाणी मिळाले पण पहिल्या जागेवर जातां येईना. तिथेंच पडून राहिलों. सायंकाळ झाली. जंगलातून आई वगैरे मंडळी आली. त्यांना म्हटलें, आई, माझें अंग दुखतें. आई म्हणाली, मग दुखतें तर तुला काय धरून बसूं आणि संध्याकाळीं काय खाऊं! दुखते तर पडून रहा. होईल आपोआप बरें! असे दोन चार दिवस गेले. जीव वैतागला. एक दिवस शेतावर गेलो आणि सारा दिवस उन्हांत पडून राहिलो. उन्हांचे चटके बसेतो पडून राहिलो. ४—५ दिवसांनीं खरोखरच ताप आपोआप राहिला.

आज या वेळीं तो दिवस आठवतो मी आजारी आहे. तुम्हीं सारी कितीतरी माणसें जवळ आहांत, किती प्रकारचीं औषधें आहेत. कितीतरी डॉक्टर येत आहेत! हें सुख मी या मार्गाला लागलो म्हणून मिळालें. भजनाचा हा लाभ आहे. माझें माझें म्हणून बायकापोरांत गुंतलों असतो, तर कांहीं लाभ तर झालाच नसता पण आजपर्यंत मेलोहि असतो. कुटुंबाचे पायदळणीं मरून गेलो असतो.

एक दिवसाचे अन्न घरीं खायला नसायचे. अंबाडीची भाजी आणून शिजवायची, त्याला मीठ नाहीं, मिरची नाहीं—मग तेल कुठले? तसेंच गोळे तोडून पोटांत गटागट घालावे लागत असत. असे कठीण दिवस काढून, तावून सुलाखून निघालेले हे शरीर आज या सर्व सुखाला पात्र झाले. ते सुख सांगता येत नाहीं. माझे कांहीं दुखत नाहीं—कांहीं नाहीं. तुम्हां सर्वांच्या देखत आजचा दिवस मोठा, चांगला—सुवर्णाचा—आहे असे वाटते.

सुखासाठीं सर्वांची तळमळ आहे-पण सुख कशांतही नाहीं—धनवान मानवांत—अधिकारी लोकांत—यांच्या घरीं तर नाहींच नाहीं पण पंडीत नेहरू सरकारच्याहि घरीं नाहीं. ते सुख कोठे आहे तर-तुकोबारायांनीं सांगितलें आहे—

**सुख वसे एके ठायीं ।**
**बहुपायीं संतांच्या ॥**

संत सांगतात, "मनासारिखें न होता । बालकांशी मारे माता ॥" आईने सांगितलेले काम मुलाने केले नाहीं, तर आई वाट पहात नाहीं, लगेच सपाटा टेवून देते.

आपण आज ज्यांच्या घरीं बसलों आहोंत ते मंत्री आहेत. यांचा मोठा धाक आहे! बाईसाहेब आहेत, त्यांना चार मुलें आहेत. पुढें मुलांची लग्नें होतील, सुना येतील. त्या बाईचें ऐकणार नाहींत—एक पुढेंच बोलेल. दुसरी न विचारतां खाईल, त्यांना कसें आवरावे—तर हें सुख नसून दुःख आहे. हा बंगला सोडून जावें लागेल. सर्व दुःख आहे! बरं सुनेला मारावें तर लोक तमाशा पाहतील. मुलगा कांहीं बोलत नाहीं, जवान झाल्यावर वेगळा निघणार, वगैरे हीं सर्व दुःखेंच नाहींत कां?

मनुष्य पाप आणि पुण्य समजत नाहीं. आज या साहेबांच्या दारांतूनच आपल्याला लवून नमस्कार करून आंत यावें लागत आहे. उद्यां हा दिवस बदलला म्हणजे गाडी उलट होईल! म्हणून तुकोबाराया म्हणतातः—

राजे होती रंक, यमाचिये घरीं ।
नांदणूक बरी । नाहीं म्हणूनी ॥

ज्यांची करणी बरी नाहीं, ते राजेसुद्धां यमाच्या दरबारांत शेवटीं रंक होतात व आपल्या कृतकर्मांची फळें भोगतात.

● कविता, किर्ती, कांता, आणि कांचन यांना स्वतःचें जीवन नसतें. दुसऱ्यासाठीं त्याग करणें यांतच त्यांची अलौकिता आणि श्रेष्ठता साठवलेली आहे.

२

## देवाला कुठं मरण असतं ?

दिवाळीचे दिवस—घरोघर आनंदाचे वातावरण होते. श्री बाबा या दिवाळीच्या ऐन मोसमांत मुंबईसच होते. तीन तारखेला श्री बाबांच्या किर्तनाचा कार्यक्रम चिराबाजारांत अगोदरपासून जाहीर झाला होता म्हणून अमरावतीहून बाबा तीन तारखेला येथें आले होते. श्री. बाबा गेली १९ वर्षें रोज दोन घरीं माधुकरी मागूनच पोटाचा क्षुल्लक (त्यांच्या दृष्टीनें) प्रश्न सोडवतात. अशाच माधुकरीची ही एक गोष्ट आहे. श्री बाबा भायखळ्याला एका घरीं माधुकरीसाठीं जाऊन उभे राहिले. ते घर एका माळी जातीच्या बाईचे होते. श्री बाबा आपल्या घरासमोर आले हे पाहून तिच्या आनंदाला पारावार राहिला नाहीं. त्या आनंदाच्या भरांत तीं बाई घरांत गेली आणि एक ताटभर करंज्या घेऊन आली व ते ताट तिनें श्री बाबांचे ठेविलें. श्री बाबांनीं तिला हे ताट परत घेऊन जा व मला भाकर आणून दे, अशी मागणी केली. त्या बाईनें श्री बाबांच्या इच्छेप्रमाणें भाकरी आणून त्यांच्यासमोर ठेविली. श्री बाबा तिच्या दारांत बसले. भाकरी खायला सुरुवात केली. ती बाई पण श्री बाबांच्या समोर येऊन बसली. ती बसलेली पाहून तिची एक शेजारीण पण तिच्याजवळ येऊन बसली. दोन बायका एका ठिकाणीं आल्या म्हणजे साहजिकच गप्पांना ऊत येतो. ती माळीण आपल्या शेजारणीला म्हणाली, 'माझ्या लहानपणीं ज्यावेळीं माझें लग्न झालें नव्हते त्यावेळीं मी बाबांना पाहिले होते, त्यावेळीं जसे बाबा दिसत होते—तश्शीच कांती व प्रकृति अजून कायम आहे त्यांची !'

या तिच्या जुन्या आठवणीवर श्री बाबांनीं शेजारणीला विनोदानें उत्तर दिलें. "ही लहान होती तेव्हां मी जसा होतो तसा आज पण आहे—खरं आहे मी अजून खंगलो कां नाहीं ! अजून मेलो कां नाहीं ? असंच ना तुला म्हणायचं आहे ?"

बाई म्हणाली "बाबा ! असं कसं म्हणीन मी. तुम्ही कसे मराल ? तुम्ही माणसाचे देव झाला, देवाला कुठं मरण असतं होय ?"

बाबा म्हणाले "देव झालो म्हणतेस पण मी तर तुझ्यासारखा माणूसच आहे. माणसानं मरायचं नाहीं तर मग काय दगडानं मरायचं ?"

यावर बाई म्हणाली, "बाबा ! मला तसं म्हणायचं नाहीं. तुकाराम जसे विमानांत बसून वैकुंठाला गेले, तसें मरण तुम्हाला येणार—ते जसे देव झाले तसेच तुम्ही नाहीं कां ?"

श्री बाबांनीं यावर विनोदी उत्तर दिलें. ते म्हणाले, "बाई, माझी कुठं तशी पात्रता आहे ? तुकाराम विमानांतून वैकुंठाला गेले. आम्हांला गाढव तरी मिळेल कां वैकुंठी जायला ? आम्ही आपले पायींच पोहोंचणार !"

प्राप्त झालें अद्वैत ज्ञान। अभिन्नपणें जें विज्ञान।
तेंचि जाण आत्मनिवेदन। जेथें मी तूं नाहीं॥

# भक्ति आणि विभक्ति

आत्मनिवेदन म्हणजे 'देवासी वाहावें आपण' हें होय. देव कोण, आपण कोण व वाहणें म्हणजे काय, हें नीट कळल्याशिवाय आत्मनिवेदन यथार्थ समजणार नाहीं. देवाला म्हणजे उपास्य-मूर्तीला गंध, फूल, धूप, दीप, नैवेद्य वस्त्र हें वाहतां येतें; नाथांनीं म्हटल्याप्रमाणें 'दारासुतगृहप्राण, करावें भगवंतासी अर्पण.' हेंही वेळेला करितां येईल; पण आपण आपल्याला वाहायचें म्हणजे काय, हें मात्र कळणें कठिण आहे! आपलीं बायकामुलें, घरदार, जमीनजुमला, स्थावर जंगम इस्टेट, आपली बुद्धि, आपलें मन, व आपला अहंकार हे सर्व देवाला वाहिल्या-वरही जो 'आपण' म्हणून उरतो तोही देवाला वाहणें ही खरी आत्मनिवेदनभक्ति होय. सलोकता, समीपता, व सरूपता ह्या तीन मुक्ति चळ आहेत, सायुज्यता मुक्ति मात्र अचळ आहे. 'सगुणभक्ति ते चळे। निर्गुणभक्ति ते न चळे।' अशी अचळ भक्ति व अचळ मुक्ति आत्मनिवेदना-शिवाय प्राप्त होत नाहीं व ते आत्मनिवेदन कळण्यास तत्त्वविचार करावें असें सम-र्थांनीं म्हटलें आहे. श्रवणभक्ति हा प्रारंभ व आत्मनिवेदनभक्ति हा शेवट.

आत्मनिवेदन यथाशास्त्र होण्यास देव कोण व मी कोण, याचा विवेकानें उलगडा झाला पाहिजे. देव कोण तो ओळखावा व आपला आपण अंतर्यामीं शोध घ्यावा. देव आणि भक्ति हे अभिन्नपणानें पाहणें म्हणजेच हृदयभुवनांत जीव आणि परमात्मा एका आसनावर बसविणें होय. 'भक्त म्हणजे विभक्त नव्हे तो' हा विचार दृढ झाल्या-वांचून समाधानाची प्राप्ति नाहीं. भक्त म्हणजे देवापासून आपल्याला वेगळेपणानें न पाहणारा. जो विभक्त आहे, म्हणजे देवाहून मी वेगळा आहे असें भासवतो, तो भक्त नाहीं. पण हा 'मी' कोण? ह्या 'मी' ला कोठें धुंडावें?

पिंड आणि ब्रह्मांड असे वेगळे कल्पून पिंडांतच पिंडाचा विचार करायचा व तोच विचार ब्रह्मांडाला लागू करायचा. **'पिंडीं तें ब्रह्मांडीं'** हा न्याय बरोबर आहे. एक उदाहरण सोडविलें कीं, त्या जातीचीं हजारों उदाहरणें तशींच सुटतात. एकदां रीत समजली म्हणजे झालें. पिंडही पांचभौतिक. व ब्रह्मांडही पांचभौतिक. पिंडाचा एकदां यथार्थ विचार झाला, कोणकोणत्या तत्त्वांचा तो गोळा बनला आहे तें उमगलें म्हणजे ब्रह्मांडाचा विचार कांहीं निराळा करायला नको आहे. सकळ दृश्य तत्वरूप आहे, तत्वांचें गांठोडें आहे, तें सोडूं लागलो म्हणजे गाठोडें कोठेंच सांपडत नाहीं! पिंडांतलें एकेक तत्व

घेऊन त्याची चिरफाड करूं लागलों म्हणजे त्यांत 'मी' हा पदार्थ कांहीं कोठें सांपडत नाहीं! सहज आत्मनिवेदनाचा हा सुलभ मार्ग आहे. 'मी' ला आपण शोधीत नाहीं, तोंपर्यंतच तो आपला करडा अंमल इंद्रियांवर चालवीत आहे; पण त्या 'मी' ला आपण शोधूं लागलों कीं त्यानें आपलें काळें केलेंच म्हणून समजावें! त्या 'मी' ला दडवणें हेंच आत्मनिवेदन. हा भव्य विश्वाकार नाना व्यक्तींनीं भरून गेला आहे. हें विश्व म्हणजे, ज्ञानोबारायांनीं म्हटल्याप्रमाणें, भूतसृष्टीची प्रचंड टांकसाळ आहे.

तथापि लटकी देहअहंता मध्येंच हा 'मी' उत्पन्न करिते, पण 'विचारें पाहों जातां कांहींच नाहीं!' 'तत्वेंच मी' हा जो भ्रम आपणांस झाला आहे, तो घालविण्यासाठीं आपण तत्वांहून वेगळे होऊन पाहण्याचा अभ्यास ठेवावा:—

तत्वें साक्षत्वें वोसरती।
साक्षत्व नुरे आत्मप्रचिती॥
आत्मा असे आदिअंतीं।
आपण कैंचा॥

मी तत्वांचा साक्षी आहे, तेव्हां त्याहून भिन्न आहे असें आधीं जाणावें. हा अभ्यास दृढ झाल्यावर मग तें साक्षित्वही आत्मप्रचीतीनें दूर करावें; कारण समर्थांनीं दुसरीकडे म्हटल्याप्रमाणें 'त्यांत साक्षत्वाचा दोरा। तोही तत्वरूप!' तत्वें साक्षित्वानें दूर करावींत व साक्षित्व निश्चयपदप्राप्तीनें दूर करावें. निश्चळ पद तुटेना, फुटेना, चळेना, ढळेना असें आहे. अशा स्वरूपाची प्राप्ति हीच सायुज्यगति, हाच मोक्ष, हेंच सर्वांस साधावयाचें अंतिम ध्येय आहे. आत्मा स्वानंदघन आहे. 'आत्मा आहे निर्गुण व निरंजन' व त्याच्याशीं आपण अनन्य झाल्यावर आपण अनन्यपणानें उरणार कसे? आत्मा आहे अद्वैत, मग माझ्यावेगळ्या द्वैताला अवकाश कसचा सांपडणार? 'आपण मिथ्या साच देव। देव भक्त अनन्यभाव' असा अनुभव आला म्हणजे आत्मनिवेदन सहजच होतें. स्वरूपीं दृढबुद्धि झाल्यावर जीवशिवउपाधीच समूळ नाहींशी होते. मग मीपणाला वाव



• जीवन हें रेशमाच्या किड्यासारखें असावें. रेशमाचे तंतू जगाला पुरविण्यांत त्या किड्याचा काय स्वार्थ असतो सांगा?

कोठें मिळणार ? देवाशीं अभिन्नपणाची जी अखंड भावना तेंच खरें आत्मनिवेदन होय. समर्थांनीं आत्मारामग्रंथांत म्हटलें आहेः—

प्रात झालें अद्वैतज्ञान ।
अभिन्नपणें जें विज्ञान ।
तेंचि जाण आत्मनिवेदन ।
जेथें मी तूं नाहीं ॥

सर्व संतांचा एकच अनुभव आहे व एकच बोध आहे. नाथमहाराज भागवतांत (अ० ३-८३९) म्हणतातः—

द्वैतभावें भजनविधी ।
ते जाणावी स्थूल बुद्धि ।
भजनाची भजनसिद्धी ।
जाण त्रिशुद्धी तन्मय होणें ॥

श्रीज्ञानेश्वर महाराजांनीं गीतेच्या शेवटीं 'मामेकं शरणं व्रज यावर टीका करितांना म्हटलें आहेः—

मग अज्ञान निमालिया ।
मीचि ऐक असे अपैसया ॥
सनिद्र स्वप्न गेलियां ।
आपणपैं जैसें ॥
तैसा मी एकवांचूनि कांहीं ।
मग भिन्नाभिन्न आन नाहीं ॥
सोहंबोधें तयाच्या ठायीं ।
अनन्य होय ॥
पैं आपुलेनि भेदेंवीण ।
माझें जाणणें जें एकपण ॥
तयाचि नांव शरण ।
मज येणें गा ॥

श्रीतुकाराम महाराज सांगतातः—

देह नव्हे मी हें खरें ।
उरला उरे विठ्ठल ॥ १ ॥
म्हणउनि लाहो करा ।
काळ सारा चिंतनें ॥ २ ॥
अमर आहां अमर आहां ।
खरें कीं पहा खोटें हें ॥ ३ ॥
न म्हणा देह माझा ऐसा ।
मग भरंवसा कळेल ॥ ४ ॥
देवचि बरे देवचि बरे ।
तुका म्हणे खरे तुम्ही ॥ ५ ॥

## पूर्णोद्गार

तरुवर बीजापोटीं ।
बीज तरुवराशेवटीं ॥
तैसें तुम्हां आम्हां जालें ।
एकीं एक सामावलें ॥
उदकावरी तरंग ।
तरंग उदकाचें अंग ॥
तुका म्हणे बिंबछाया ।
ठायीं पावली विलया ॥

★

लवण मेळवितां जळें ।
काय उरलें निराळें ॥
तैसा समरस जालों ।
तुजमाजीं हारपलों ॥
अग्निकर्पूरांच्या मेळीं ।
काय उरली काजळी ? ॥
तुका म्हणे होती ।
तुझी माझी एक ज्योती ॥

★

बीज भाजुंने केली लाही ।
आम्हां जन्ममरण नाहीं ॥
आकारासी कैंचा ठाव ।
देह प्रत्यक्ष जाला देव ॥
साखरेचा नव्हे ऊंस ।

आम्हां कैचा गर्भवास ॥
तुका म्हणे अवघा जोग।
सर्वां घटीं पांडुरंग ॥

★

मरणाहातीं सुटली काया।
विचारें या निश्चयें ॥
नासोनीयां गेली खंती।
सहजस्थिती भोगाची ॥
न देखेसे जाले श्रम।
आलें वर्म हातां हें ॥

तुका म्हणे कैंची कींव।
कोठें जीव निराळा ॥
गोडीपणें जैसा गूळ।
तैसा देव जाला सकळ ॥
आतां भजों कवणेपरी।
देव सबाह्य अंतरीं ॥
उदकावेगळा।
नव्हे तरंग निराळा ॥
हेमअळंकारा नामीं।
तुका म्हणे तैसे आम्हीं ॥

---


## श्रीसाईबाबा शिरडी संस्थानांत विक्रीस असलेलीं पुस्तकें

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| (१) | श्रीसाईसच्चरित | (मराठी) | किंमत | रु. | ७–०–० |
| (२) | सच्चरित | (इंग्रजी) | ,, | ,, | ४–०–० |
| (३) | दासगणूकृत श्रीसाईनाथ–स्तवनमंजरी | | ,, | ,, | ०–२–० |
| (४) | ,, | (अध्याय ४) | ,, | ,, | ०–८–० |
| (५) | सगुणोपासना | | | | ०–३–० |
| (६) | प्रधानकृत पुस्तक (A glimpse of Indian spirituality) | | ,, | ,, | १–०–० |
| (७) | श्री साई–लीलामृत | | ,, | ,, | २–०–० |
| (८) | श्री साई–सुमनांजली | | ,, | ,, | ०–१–० |
| (९) | कीर्तन–पंचक (श्री साईलीलांनीं नटलेलें) | | ,, | ,, | १–८–० |
| (१०) | शीलधी | (शिरडी वर्णन) | ,, | ,, | ०-१२-० |
| (११) | श्रीसाईबाबा–अवतार व कार्य | | ,, | ,, | २–०–० |
| (१२) | श्रीसाई गीतांजली | | ,, | ,, | ०–२–० |
| (१३) | हिंदी श्रीसाईसच्चरित | | ,, | ,, | ४–८–० |

**वरील पुस्तकें खालील पत्त्यावर मिळतील:—**

(१) सर कारकून, श्रीसाईबाबा शिरडी संस्थान, पोस्ट–शिरडी, जि. अहमदनगर.
(२) श्रीसाईबाबा शिरडी संस्थान, मुंबई ऑफिस : ईस्ट अँड वेस्ट इं. कंपनी बिल्डिंग, ४९।५५ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई १

# स्वामी रामतीर्थांचीं बोधवचनें

संकलक : लक्ष्मीकांत ना. गिंडे

( १ ) उद्योग, दीर्घोद्योग, अविश्रांत परिश्रम हेंच यशःप्राप्तीचें मुख्य साधन आहे.

( २ )कोणतेंहि कार्य करीत असतांना तद्रूप होणें हाच एक यशाचा उपाय आहे.

( ३ ) प्रत्यक्ष यशाची प्राप्ती होण्यापूर्वीं यशाच्या वासनेचा पूर्ण निरास–बींमोंड झाला पाहिजे.

( ४ ) निरपेक्षबुद्धीनें कर्म करणें हाच वेदान्तप्रतिपादित वैराग्याचा अर्थ होय.

( ५ ) लोकांच्या आपणासंबंधीच्या चांगल्या किंवा वाईट भाषणाला किंवा वर्तनाला आपल्या अंतःकरणांत थारा देऊं नका; तें स्वप्नवत्, मिथ्या आणि भ्रामक आहे ही गोष्ट लक्षांत ठेवून त्या संबंधाचे विचार अजिबात विसरून जा.

( ६ ) श्रद्धेचा ओघ बहिर्मुख न करतां तो अन्तर्मुख करणें, स्वतःकडे आत्म्याकडे वळवणें, आत्मश्रद्धा ठेवणें हा मार्ग किती सरळ व स्वाभाविक आहे बरें!

( ७ ) परिस्थितीचा विचारच सोडा. आपली श्रेष्ठता ओळखून नेहमीं न्यायाधिशाप्रमाणें वागत जा.

( ८ ) कर्तव्याचें दडपण झुगारून द्या. तो एकप्रकारचा उत्साहवर्धक व्यायाम आहे, करमणुकीचा खेळ आहे, असें समजून एखाद्या बादशाहाप्रमाणें, चैनींत आपलीं कामें करीत जा.

( ९ ) ईश्वरापुढें दुसऱ्या कशाचीहि किंमत मानूं नका; त्याच्याइतकें कोणत्याच गोष्टीला महत्त्व देऊं नका.

( १० ) 'अहं ब्रह्मास्मि' या भावनेचा निदिध्यास करा.

( ११ ) तुम्हीं जेव्हां निराश झालां असाल, जेव्हां उदासीनता आणि उद्विग्नता यांचा तुमच्या मनावर पगडा बसला असेल तेव्हां आपल्या नात्यागोत्याचे संबंध, विषयांवरील आसक्ति, मनांतील सर्व तऱ्हेच्या इच्छा, क[illegible] आणि आकांक्षा यांना फांटा देण्याचा प्रयत्न करात जा. आपण स्वतंत्र आहों, मुक्त आहों, अशी दृढ भावना करीत जा.

( १२ ) बाह्य प्रतिकूल परिस्थितीचा मनावर यत्किंचित्‌हि परिणाम न होणे, संकटांत खचून न जातां वृत्तीची शांतता केव्हांहि भंगू न देणें हीच ईश्वरभक्ति अंगीं बाणल्याची खूण होय !

---

**प्रवचन**—श्री. डॉ. अण्णासाहेब गव्हाणकर (सं. प्रे.) मुंबई, वादन-नकला श्री. जयसिंग भोई मुंबई, नवीन वाद्य इलेक्ट्रीकवर चालणारे, बासरी वादन, नकलांचा कार्यक्रम.

**नृत्यः**—कुमारी नंदा इत्यंगडी मुंबई.

**गायनः**—श्री. आमटेबुवा फलटण. श्री. विमल वैद्य-मुंबई, कु. कुमुद गलगले नाशिक. सौ. मालतीबाई साळवी वरळी मुंबई. श्री. गणेश राहता. श्री. माधवराव इंगळे, पुणें. श्री. बोरकर मुंबई. श्री. हिराबाई बेळगांवकर. श्री. दुलनबाई बेळगांवकर श्री. शंकरराव पोटे मुंबई. श्री. श्रीराम महादेव मराठे कोल्हापूर. श्री. रामदास मोरे, दर्यापूर उमरावती.

या महिन्यात संस्थानच्या धर्मार्थ दवाखान्यास खालील देणग्या मिळाल्या. मिसेस एच. पी. दस्तुर दिल्ली २० रु. श्री. कांतिलाल मोतिराम चोकसी मुंबई. ५१ रु., श्री. डी. आर. पटेल ग्वालीयर १०० रुपये. या महिन्यांत ११०० रुग्णावर उपचार करणेत आले.

# नोव्हेंबर १९५६

**या** महिन्यांत श्रीसाईदर्शनासाठीं भक्तांची फार गर्दी झाली. कांहीं कलाकारांनीं श्रीपुढें हजेरी दिली. त्यांतील कांहीं कार्यक्रम खालीलप्रमाणें:—

**कीर्तनः**—श्री. ताराबाई जोशी सिताबर्डी नागपूर. सं. गवई श्री. मराठे यांची या महिन्यांत का. शु॥ ११ का. व॥ ११ व श्री. ज्ञानेश्वर पुण्यतिथी अशी ३ कीर्तनें श्रीमंदिरांत झाली.

**नकलाः**—श्री. प्रल्हाद हरी लव्हाटे व श्री. द. आ. भिडे बोरीवली (मुंबई)

**तबला वादनः**—श्री. पांडुरंग दगडोबा सांळुके, गंज पेठ पुणें.

**गायनः**—कु. भानुमती मुर्कुटे मुंबई. कु. मालती आजगावकर मुंबई. सौ. विमल देशपांडे पंढरपूर. श्री. ललिताबाई धनवटे. कु. कुमुदिनी हाटोळकर, श्री. गणपतराव मुंबई. श्री. एल. जी. सोहनी मुंबई. श्री. टी. एस पेडणेकर, मुंबई. श्री. हरिभाऊ वाटवे पुणें. सौ. मनुबाई टिल्लू मुंबई. श्री. कमलाकर आरोंदकर मुंबई. (खांबेश्वर भजनी मंडळी) श्री. शशिकांत म्हापसेकर मुंबई. श्री. शंकरराव थरवण माटुंगा मुंबई. श्री. नरहरबुवा व्यास, कोपरगांव. सौ. विमलाबाई एम धुळें. श्री. रघुवीर, धुळे.

**श्रीमंदिरांत लक्ष्मीपूजनः**—श्री. बाजीराव तात्याजी कोते पाटील शिर्डी (सं. ट्रस्टी) व श्री. भास्करराव ढेकणे व्यवस्थापक अधिकारी साहेब यांचे हस्ते श्रीलक्ष्मी–सरस्वती–पुजन झाले व दिपवाळी निमित्त दिव्याची रोषणाई कळसावर व इतर सर्व ठिकाणीं करणेत आली. तसेच शोभेची दारू फटाके वगैरे उडविणेत आले. तसेंच संस्थानचे सर्व नोकर सेवेकरी व प्रतिष्ठित निमंत्रित मंडळी यांना दिपवाळीचा फराळ देणेत आला. व त्याच वेळेस संस्थान क्रिडामंडळाचें उद्‌घाटन झाले. या महिन्यांत संस्थानच्या धर्मार्थ दवाखान्यासः—श्री. गोलवाला मुंबई रुपये ११, श्री. एन. जे. आंटीया मुंबई रुपये १०१, मि. एच. पी. दस्तुर दिल्ली रु. २०, श्री. जी. एन. अणामेरा, मुंबई रु. १०१, अशी देणगी मिळाली.

यामहिन्यांत १२५० रुग्णांवर उपचार करण्यांत आले.

———

# श्री. साईनाथ प्रसन्न

श्रीसच्चिदानंदसद्गुरु साईबाबामहाराज मु॥ शिर्डी ता. कोपरगांव जि. अ. नगर यांचा आडतिसावा पुण्यतिथी उत्सव शके १८७८ आश्विन शु॥ १० दि. १४ आक्टोबर इ. स. १९५६ रविवार रोजीं साजरा झाला. उत्सवास मुंबई, पुणें, कल्याण, ठाणे, नासिक, हैद्राबाद, मद्रास वगैरे लांबून बरेच भक्त आले होते. उत्सवास प्रारंभ आश्विन शु॥ ९ शनिवार दिनांक १३।१०।५६ रोजीं झाला. या दिवशीं नियमित कार्यक्रमाव्यतिरिक्त दोन-प्रहरीं श्री. श्री. बा. देव (सं. ट्र.) यांचे कीर्तन, रात्रौ श्री. डॉ. अण्णा-साहेब गव्हाणकर यांचे प्रवचन झाले. दिनांक १४।१०।५६ रविवार रोजीं सकाळीं सामुदाईक अभिषेक पूजा, १० ते १२॥ पर्यंत श्री. श्री. बा. देव यांचे साईपुण्यतिथी—चरित्रावर कीर्तन, दुपारी आराधनाविधी, सायंकाळी मंत्र जागर, सिमोल्लंघन मिरवणूक, रात्रौ श्रींचे रथाची गांवांतून मिरवणूक व रात्रौ निरनिराळ्या कलाकारांचे गायनवादनाचे मनोरंजक कार्यक्रम झाले. दिनांक १५।१०।५६ सोमवार रोजीं सकाळीं भिक्षा, मिरवणूक, सामुदाईक अभिषेक पूजा, श्रींचे जुने कापडांची प्रसाद म्हणून विक्री—दोन प्रहरीं श्री. श्री. बा. देव यांचे कीर्तन, रात्रौ श्रींचे पालखीची गावांतुन मिरवणूक आरती. दिनांक १६।१०।५६ मंगळवार रोजी काला कीर्तन दही हंडी होऊन उत्सव समाप्त झाल्याचे जाहीर करणेत आले. उत्सवाप्रित्यर्थ शिर्डीगांवांतील मुलांनी "शेतकरी" या नाटकाचा प्रयोग करून दाखविला. उत्सवाप्रित्यर्थ साईसंस्थान नोकरांना प्रत्येकी रुपये पांच प्रमाणे बक्षिस देणेत आले. उत्सवानिमित्त संस्थानचे अधिकारी वर्ग म्यानेजिंग ट्रस्टी, इतर ट्रस्टी, अध्यक्ष, मेंबर, ऑ. सेक्रेटरी मंडळी हजर होती. उत्सवाप्रित्यर्थ मांडव, कापडखोल्या, कापडकमानी, लतापल्लव वगैरेनीं सुशोभित केलेली होती. पोलिस बंदोबस्त होता. होमगार्ड, स्वयंसेवक पथक वगैरेनीं मदत केली. आरोग्यखात्याकडून स्वच्छता उत्तम ठेवण्यांत आली होती. सुमारें५०००भक्त बाहेरगांवाहून आले होते.


दृष्टींतील तेज म्हणजेच जीवनाच्या उत्कर्षांतील प्रमुख अंग होय

म्हणून दिव्य दृष्टि देणाऱ्या स्वस्त आणि टिकाऊ चष्म्याला प्रमुख स्थान मिळतें.



त्याकरितां— शिसा ऑप्टिशिअन्स

(चष्म्यांचे व्यापारी)

हें एक नांवाजलेलें दुकान आहे.

यांच्या येथें डोळ्यांच्या तज्ज्ञ डॉक्टरांकडून डोळे मोफत तपासले जातात.

छबीलदास रोड, दादर (W. R.), मुंबई २८.

१९५६ सालांत बिल्डिंग फंडासाठीं खालील प्रमाणें देणग्या मिळाल्या.

| | रु. आ. पै |
|---|---|
| मे॥ गोल्ड सोप कं. सांकली स्ट्रीट मुं. ८ | ४१४—०—० |
| श्री. जे. जे. के. पटेल, मुं. १. | ९००—०—० |
| ,, एम्. यू. शुक्ल, मुं. ४ | १०१—०—० |
| ,, टी. एच. अॅडव्हानी, मुं. १ | १०००—०—० |
| मिस्. जी. बी. मालवणकर मुं. १४ | १७०—०—० |
| श्री. एस. डी. अक्की विजापूर | २००—०—० |
| ,, सी. जी. पटेल, कंपाला | १५१—०—० |
| ,, आर. एम. वकील मुं. ६ | ५०—०—० |
| श्रीसाईभक्त, मुंबई | २००२—०—० |
| श्री. डी. डी. रासनें, पुणें | १४८—०—० |
| ,, डी. एम्. व्यास, उगांडा | १२५—०—० |
| ,, जी. अॅटिया मुं. १ | ६८०—०—० |
| ,, आर. एस. अलेकोल, मुं. १ | २२०—०—० |
| ,, हिरालाल एन. पटेल, नयरोबी | १०१—०—० |
| श्री. मंघाराम नैनाराम तांजेर, | ७२—१४—० |
| ,, बी. जे. पोस्टवाला, पुणें. ३, | २०३—०—० |
| ,, आर. एन्. पटेल. एर्नडोला | १०६—०—० |
| ,, व्ही. के. श्रॉफ, मुंबई, १९ | ३००—०—० |
| ,, जी. एफ. देसाई, नाडियाद | ५१—०—० |
| ,, भास्करभाई जमनादास एन. भाऊ मुंबई ४. | ११५१—०—० |

# साईनाथ गुरु दैवत माझे

सांईनाथ गुरु दैवत माझे।
त्रिभुवनिं ज्यांचें नामचि गाजे ॥ धृ ॥

नानांचे[1] तें पुण्य वेगळे।
उदी आरती धाडिति सबळें।
होउनि टांगेवाला वारी।
संकट नानांच्या दुहितेचे ॥ १ ॥

माधवरावावरि[2] जो प्रेमा।
ठाउक नाहीं त्याला सीमा।
गयावळाच्या सदनीं बैसुनि।
भक्तोद्धारक नामचि साजे ॥ २ ॥

लक्ष्मीव्रत[3] उद्यापन भोजनि।
बापू[4] श्यामा[5] यती होउनी।
भोजन करूनि कळून दिधले।
बाळहि[6] पश्चात्तापे लाजे ॥ ३ ॥

विनती करि श्रीपाद[7] पदांबुजिं।
उपदेशामृत सर्वां पाजी।
विचलित ना हो चित्रमदिय हे।
जिव्हा गावो नामचि तुमचे ॥ ४ ॥

---

**टीप :** (१) कै. नानासाहेब चांदोरकर, (२) कै. माधवराव देशपांडे तथा श्यामा (३) कै. बाळासाहेब देव यांच्या मातुः श्री. (४) कै, बापूसाहेब जोग, (५) कै, माधवराव देशपांडे. (६) कै. बाळासाहेब देव (७) पूज्य बाळकृष्णजानकी सुत श्रीपाद देव.

—**श्रीपाद बाळकृष्ण देव**

# तुमको लाखो प्रणाम

तुमको लाख्खो प्रणाम,
लाख्खो प्रणाम ॥ ध्रु ॥
तुम साई कहानेवाले,
तुम दत्त कहाने वाले,
गोदातीर निवासी तुमको,
शिरडी रहेनेवाले तुमको ॥
भक्तोंका सुखकारी तुमको,
भक्तोका दुखहारी तुमको ॥ १ ॥

शंकरजीका रूपही तुमहो ।
रामचंद्रका रूपही तुमहो ॥
त्रैमूर्तीका रूपही तुमहो ।
गणेशजीका रूपही तुमहो ।
नारायणका रूपही तुमहो ।
विठ्ठलजीका रूपही तुमहो ॥
तुमको लाख्खो प्रणाम ॥ २ ॥


मेरा शिर तुम चरणोपरही ।
सदैव राहे मेरी विनती ।
खास सुनोंगे आशा मेरी ।
पुकार करुंहू सांई सांई ।
तुमको लाख्खो प्रणाम ॥ ३ ॥

— जानकी–बाळकृष्ण–सुत

---

## अहमदनगर स्टेशनाहून श्री क्षेत्र शिर्डीला येणाऱ्या जाणाऱ्या बस सर्विसचें नवें वेळापत्रक

**अहमदनगर रेल्वे स्टेशन**
निघते–सकाळीं ६–५०
**शिरडी** ,, ,, १०–१५
**कोपरगांव स्टेशन** येते ,, १०–४५
**कोपरगांव स्टेशन**
निघते–दुपारी १२–५०
**शिरडी** ,, ,, १३–२०
**अहमदनगर रेल्वे स्टेशन**
येते–दुपारीं ४–१५



● प्रत्येक जीवात्मा हा स्वभावतः परमात्मरूप आहे. अंतर्बाह्यसृष्टीचें नियमन करून अंतस्थ परमात्मरूप व्यक्त करणें हेंच प्रत्येकाचें साध्य आहे. कर्मयोगानें, भक्तियोगानें, राजयोगानें, ज्ञानयोगानें अथवा या सर्वांच्या मदतीनें तुम्ही मुक्त व्हा. यांत सर्व धर्म आला. मतें, आचार, ग्रंथ, देवळें इत्यादि गोष्टी गौण आहेत. मुक्ति मिळविणें हेंच मुख्य साध्य आहे.

—विवेकानंद

किं. १० आणे (६२ नये पैसे)




शिरडी संस्थानचें अधिकृत त्रैमासिक



# श्री साई लीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत त्रैमासिक ]

**वर्ष ३४ वें : अंक ४ था**

वार्षिक वर्गणी रु. २-४-० (ट. ख. सह)

**ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर १९५७**

संपादक—

**नागेश आत्माराम सावंत**

**रामचंद्र महादेव राणे**

टे. नं. २६१२७४

कार्यालय—

**ईस्ट ॲण्ड वेस्ट इं. कं. बिल्डिंग,**
**४९।५५ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुं. १**


## श्री साईवाक्सुधा



★

चुकावा जन्ममरणावर्त ।
ऐसें जयाचे मनीं निश्चित ।
प्रयत्नें रहावें धर्मवंत ।
स्वस्थचित्त सर्वदा ॥ २१६ ॥
त्यागावे तेणें बोल वर्मी ।
कोणास छेदूं नये मर्मीं ।
सदा निरत शुद्ध कर्मीं ।
चित्त स्वधर्मी ठेवावें ॥ २१७ ॥

—**श्री साईसच्चरित** अ. १९.



# अनुक्रमणिका


| विषय | लेखक | पृष्ठ |
|---|---|---|
| श्रीसाई वाक्सुधा | | ३ |
| प्रिय वाचक | संपादक | ५ |
| एक बाई आणि तिचें मूल | श्री. गोंदवलेकर महाराज | ६ |
| बाबांची लीला | | ७ |
| श्रीदासगणू महाराज | ना. वा. गुणाजी | ९ |
| सगुण भक्तींतील मोक्षाची कल्पना | ग. ल. रेगे | २१ |
| शिकंदराचा लोभ | श्रीमद् विजयलक्ष्मण सूरीश्वरजी महाराज | ३३ |
| श्रीसाईनाथांचें तत्त्वज्ञान | साईभक्त | ३६ |
| सुश्लोकगीता | वि. के. छत्रे | ४१ |
| पुण्यनगरी काशी | म. म. द. वा. पोतदार | ४४ |
| श्रीज्ञानेश्वर-जीवन | कै. वाङ्मयप्रभु त्रिलोकेकर | ४७ |
| भक्तमंडळाचे सभासद इ० | | ५० |
| शिरडीवृत्त | | ५३ |
| तूं माझी माउली | गो. म. राणे | ५४ |
| गुरु साई पाहिले गोदातिरीं | बाबांच्या बाळाचें बाळ | ५६ |

## प्रिय वाचक—

श्रीसाईलीलेचा २४ व्या वर्षाचा हा अखेरचा अंक वाचकांच्या हातीं देतांना आम्हांला कृतकृत्यतेचा आनंद होत आहे. साईलीलेच्या वाचकांना सात्त्विक, सुबोध, वाचनीय आणि मननीय साहित्य पुरविण्याचा आम्ही आमच्या अल्प मती-प्रमाणें कसोशीचा यत्न करीत आलों आहोंत. चालू वर्षाच्या अंकांतील मजकुरा-कडे नजर फेंकली तर आमचा हा यत्न बऱ्याच अंशीं सफल झाला आहे असें दिसून येईल. श्रीज्ञानेश्वर–तुकाराम इत्यादि पूर्वींचे संत, तसेंच श्रीरामकृष्ण परमहंस, विवेकानंद आदि अर्वाचीन संत यांच्या जीवनकथा आम्ही सादर केल्या आहेत. श्री.दासगणू सारख्या साईभक्त संतांच्या चरित्रांतील रोमहर्षक प्रसंग आम्हीं सांगितले आहेत, संतांच्या सहवासांत आढळणारे अनेक उद्बोधक व मनोरंजक अनुभव दिले आहेत; श्रीमद्-भगवद्गीतेचा सुरस अनुवाद प्रत्येक अंकांत येत आहे; बाबांची लीला वर्णन करणारे अद्‌भुत प्रसंग न चुकतां दिले जात आहेत, बाबांच्या भक्तांचीं स्फूर्तिप्रद चरित्रें वाचकांपुढें ठेवलीं जात आहेत, मानस शास्त्र, समाज शास्त्र, इत्यादि मह-त्वाच्या विषयांची सुलभ शैलींत वाचकांना ओळख करून देणारे लेख सादर केले गेले आहेत.अध्यात्मांतील गूढ विषय सोप्या शब्दांत सांगणारे लेख वाचकांपुढें ठेवलेले आहेत. या खेरीज शिरडीस घडणारें प्रतिमासिक महत्त्वाचें वृत्त भक्तांसाठीं दिलें जात आहे. विविधता आणि वाच-नीयता या उभयविध दृष्टींनीं साईलीलेचा प्रत्येक अंक अधिकाधिक सरस निघत असल्याचा अभिप्राय अनेक अध्यात्म-रसिकांनीं आम्हांला अगत्यानें कळविला आहे. साईलीलेला हें यश मिळवून देण्याचें ज्यांना श्रेय आहे, त्या सर्व लेखकांचे आम्हीं मनःपूर्वक आभार मानतों. ना. वा. गुणाजी, वि. के. छत्रे, ग. ल. रेगे, द. पां. खांबेटे इत्यादि लेखक आणि बाबांच्या बाळाचें बाळ, वि. ह इनामदार, टाकळकर शास्त्री, शं. बा. दाते इत्यादि कवि यांनीं श्रीसाईलीलेला गौरव आणि वैभव आणून दिलें आहे. या सर्व लेखकांचे, कवींचे आम्ही ऋणी आहोंत. श्रीसाईलीलेला नित्य जाहिराती देऊन या त्रैमासिकावर आर्थिक भार कमी होण्यास सहाय्य कर-णारे जाहिरातदार आणि श्रीसाईलीलेवर आपुलकीनें प्रेम करणारे वाचक या सर्वांचे आम्ही अगत्यानें आभार मानतों. श्रीसाई-लीलेचें हें सत्कार्य आमच्याकडून उत्तरोत्तर अधिकाधिक उत्तम रीतीनें व्हावें हीच आमची श्रीसाईचरणीं प्रार्थना आहे.

× × ×

### उपगृहमंत्री श्री. दातार यांची ‘ माझी देवभूमीची यात्रा ’

केंद्रीय गृहखात्यांतील उपमंत्री श्री. बी. एन्. दातार यांनी खास श्रीसाई-

लीलेसाठीं 'माझी देवभूमीची यात्रा' हा यात्रा—लेख पाठविला आहे. श्री. दातार यांनीं हिमालयांत केलेल्या यात्रेचें सुरस वर्णन या लेखांत आहे. लेख अतिशय विस्तृत आहे. त्यांतील कांहीं मनोवेधक व उद्बोधक उतारे श्री. साईलीलेंत आम्हीं देणार आहोंत. पुढील अंकांत तो लेख प्रसिद्ध होईल. याच अंकीं हा लेख देण्याचा आमचा विचार होता. परंतु कांहीं अपरिहार्य कारणामुळें चालू अंकांत तो लेख समाविष्ट करणें अशक्य झालें. वाचकांना हें यात्रा-वृत्त खास आवडेल एवढें आज सांगून ठेवतों.

ना. आ. सावंत
रा. म. राणे.

---

# एक बाई आणि तिचें मूल

एक बाई होती. तिचें एक छान मूल होतें. तिला वाटे आपलें मूल छान दिसावें, लोकांनीं त्याला सुंदर म्हणावें, म्हणून ती मुलाला भारी भारी कपडे घाली, सोन्यामोत्याचे दागिने घाली, आणि चांदीच्या पाळण्यांत झोंपवी. हें सर्व करण्यामध्यें त्याला दूध पाजायचें मात्र ती विसरून जाई. त्यामुळें तें मूल सारखें रडायचें आणि पुढें पुढें तर तें अगदींच रोड व निस्तेज दिसूं लागलें. एकदां तिची मोठी बहीण तिच्याकडे आली. तिनें हा प्रकार पाहून म्हटलें, 'अग हें काय तूं मांडलें आहेस? बाळाला आधीं पोटभर पाज आणि मग कपडे दागिने वगैरे घाल. त्यांची त्याला जरूरी नाहीं. त्याला त्यापासून त्रासच होतो. त्याला फक्त दुधाची अपेक्षा आहे, तें त्याला पोटभर दे.'

**तात्पर्य**—आपण आपल्या गुरूचा अगर भगवंताचा मोठा उत्सव करतों. पण त्याला शुद्ध व निःस्वार्थी प्रेम हवें असतें. तें न देतां भपकेबाज उत्सव केला तर भगवंत कसा कसा प्रसन्न होईल? भगवंताला प्रेम द्या, तें दिल्यावर उत्सव न केला तरी चालेल.

—श्री गोंदवलेकर महाराज

---




## गंगा दाराशीं आली

एका वर्षी कांहीं अपूर्व पर्वणीचा योग आलेला होता. कै. बापूसाहेब जोग व त्यांची पत्नी त्यावेळीं शिरडीस होतीं. त्यांनीं पर्वणीनिमित्त कोपरगांवीं जाऊन श्रीगंगेंत स्नान करण्याचें ठरवलें. पर्वणीच्या आदल्या दिवशीं बापूसाहेब श्रीसाईबाबांजवळ परवानगी विचारायला गेले. श्री म्हणाले, ' बापूसाब ! बघूं, त्याचा विचार उद्यां सकाळीं.' बापूसाहेब म्हणाले, ' योग तर उद्यां सकाळीं सात वाजतांनाचा आहे आणि तो साधायचा तर मोठ्या पहांटेला चार वाजतां तरी उठून इकडून निघालं पाहिजे.' तरी बाबा म्हणाले, ' बापूसाब, आपुन सकाळला बघूं.'

बापूसाहेबांनीं पुष्कळ विचारून पाहिलें पण बाबांचें आपलें एकच उत्तर, ' आपुन सकाळला बघूं ! ' बापूसाहेबांची व त्यांच्या पत्नीची निराशा झाली. बाई म्हणूं लागल्या, असा योग आयुष्यांतून एकदांच येतो. पुन्हां यायचा नाहीं. पण बापूसाहेबांना बाबांच्या आज्ञेचें उल्लंघन करून जाववेना. उभयतांना ती रात्र फारच अस्वस्थतेची गेली. ती रात्र चावडींतील होती. पहांटेस बापूसाहेब काकड आरतीला गेले. आरति संपते न संपते इतक्यांत गांवांत ओरड झाली कीं शिवेच्या ओढ्याला पाणी आलें. बाबा बापूसाहेबांना म्हणाले, ' बापूसाब, तूं सगळी रात्र मला लई शिव्या दिल्यास, पण देवाची दया ! गंगा आपल्यापाशीं आली. जा, आतां आंघोळ करून ये.' त्याप्रमाणें बापूसाहेब, त्यांच्या पत्नी, व गांवांतील इतर लहान थोर स्त्री पुरुषांनीं गंगेच्या पाण्यांत स्नानें केलीं.

गंगेचें पाणी येईल हें कोणाच्याही स्वप्नीं नव्हतें. पण त्या रात्रीं पुष्कळ कोस दूरवर कोठचा तरी बंधारा फुटला आणि शिरडीच्या शिवेच्या ओढ्यांत गंगेचें पाणी त्या दिवशीं पर्वणीच्या वेळीं आलें.

त्यादिवशीं दोनप्रहरीं आरतीच्यावेळीं बापूसाहेब सकाळच्या घडलेल्या चमत्काराविषयीं गहिंवरून बोलत असतांना, बाबा म्हणाले,

' अरे बापूसाब, देव किनई लई कनवाळू आहे! आपुणच त्याच्यावर भरंवसा ठेवत नाहीं आणि सबूरी पकडत नाहीं '

सबूरी म्हणजे सतत न ढळणारी श्रद्धा !

× × ×

## बाबांची करुणामयता

कै. माधवराव देशपांडे यांनीं सांगितलेली बाबांची एक लीला—

'एकोणीसशें चौदा किंवा पंधरा सालची ही गोष्ट आहे. तो श्रीरामनवमीच्या यात्रेचा दिवस होता. त्या दिवशीं बेसुमार यात्रेकरू श्री बाबांच्या दर्शनाला आलेले होते. किमानपक्ष साठ पांसष्ट हजारांवर यात्रा जमलेली होती. मामलेदारसाहेब, इंस्पेक्टर ऑफ पोलीस व इतर लहानथोर अमलदार बंदोबस्तासाठीं हजर होते. बाबा सकाळपासून बसले होते ते अकरा वाजून गेले तरी आपल्या जाग्यावरून हालले नव्हते. भक्तमंडळींनीं पोलीसांना विनंति केली कीं, 'यात्रा कांहीं वेळ थांबवून ठेवा आणि देवाला न्याहारी करूं द्या.' बाबा म्हणाले, 'मला भूक नाहीं!'

यावेळीं बाहेर मशिदीच्या आवारांत व आसपास माणसांची रेटारेट चालली होती. दिवस उन्हाळ्याचे होते, अंगांतून घामाच्या धारा सारख्या वाहात होत्या. पण यात्रेकरूंचा उत्साह दांडगा होता. अशा वेळीं एक मराठमोळ्याची बाई, सुमारें पांसष्ट सत्तर वर्षांची, वार्धक्यानें शरीर कृश झालेलें अंगांत कांहीं त्राण नाहीं अशी आवाराबाहेर गर्दीत सारखी आक्रोश करीत होती— 'अरे! गरीब म्हातारीवर दया कर रे! बाबा, तुझं दर्शन देरे!!' त्या भयंकर उन्हांत सारखी तळमळत होती. त्या रेटारेटींत नी गलबल्यांत तिच्याकडे पाहतो कोण नी तिचं ऐकतो कोण? मी त्या गर्दीतून सेवेसाठीं देवाकडे जात होतों. त्या म्हातारीची ती दयाजनक हांक ऐकून, ती हांक देवाला (श्रीबाबांना) केव्हांच पोंचली होती, म्हणून कीं काय माझ्या मनाला कळवळा आला. मीं त्या म्हातारीचा हात पकडला आणि म्हटलें, 'चल, बये माझ्याबरोबर! मी तुला देवाचं दर्शन घडवतों!'

त्या म्हातारीला जो आनंद झाला तो मी केव्हांच विसरलों नाहीं. पोलीस मला ओळखत असल्यामुळें त्या भयंकर गर्दीतून आम्हांला आंत जायला वाव मिळाला. देवाच्या (श्रीबाबांच्या) जवळ जातांच त्या म्हातारीनें आरोळी मारून देवाच्या कमरेला घट्ट मिठी मारली. तिच्या डोळ्यांतून अश्रूंचें पूर वाहात होते. कांहीं वेळ पर्यंत तिच्यानें बोलवेना. देवानें तिचें माथें व पाठ कुरवाळून तिला तिच्या घरच्या बारीकसारीक गोष्टी विचारल्या व म्हटलें, 'आये, मी कंवापासून तुजी वाट बघतुंग! तूं मला खायला काय आणलंस?'

म्हातारीनें म्हटलें, 'माझ्या बाबा, मी एक भाकर नि दोन कांदे आणले. वाट चालून चालून थकलें. सकाळला ओढ्यावर अर्धी भाकर नि एक कांदा खाल्ला. आतां मजपाशीं अर्धी भाकर आणि कांदा आहे तो तूं खा.' असें म्हणून तिनें पदराला बांधलेली अर्धी भाकर आणि कांदा देवाला दिला. देवानें (श्रीबाबांनीं) ते पदार्थ तेथच्या तेथेंच खाल्ले व म्हटलें, 'आये, तुझी भाकर मला लय गोड लागली ग!'

त्या म्हातारीला आपण कृतार्थ झालों असें वाटलें. तिनें देवाच्या हातचा प्रसाद व उदीं घेतली व तेथून ती निघाली. म्हातारी आनंदानें बेहोष झाली होती. पोलिस पार्टीनें तिला सुखरूप वाटेला लावून दिलें. होतें. हें सांगून श्री. माधवराव म्हणाले, "ही गोष्ट मी कधीं विसरणार नाहीं. जया मनीं जैसा भाव, तया तैसा अनुभव!"

———

# अर्वाचीन महीपति

# श्रीदासगणूमहाराज

लेखक—ना. वा. गुणाजी

'उल्हास साईभक्तीचा । दास गणूनें विस्तारिला साचा ॥
वाढविला साई प्रेमरसाचा । स्वानंदाचा सागर ॥

—श्रीसाईसच्चरित अ. १५–३२

श्रीसाईलीलेच्या मागील अंकांत (वर्ष ३४, अंक १ ला—जानेवारी—फेब्रुवारी—मार्च १९५७ च्या अंकांत) असें सांगितलें आहे कीं, नानासाहेब चांदोरकरांची दुसरी मोठी कामगिरी म्हणजे त्यांनीं श्रीसाईबाबांच्या कीर्तीचा प्रसार स्वतः आणि श्रीदासगणू महाराज यांचे-द्वारा करून मुंबईच्या आजूबाजूच्या लोकांना बाबांच्या सहवासाचा आणि आशीर्वादाचा लाभ करून दिला. नानासाहेबाचें चरित्र वर नमूद केलेल्या व त्या पुढील अंकांत येऊन गेलें आहे. आतां त्यांचे बाबाच्या कीर्तिप्रसार—कामांतील साथीदार श्रीदासगणू महाराज यांचें चरित्र किंवा माहिती देणें हें क्रमप्राप्तच आहे. तेव्हां हें काम आतां करण्याचें योजिलें आहे.

कांहीं वर्षांपूर्वीं आम्हीं शिरडीस श्री साईबाबांच्या दर्शनासाठीं गेलों होतों. त्यावेळीं तेथील एका रहिवाशी भक्तानें असें सांगितलें कीं, प्रथमारंभीं पुष्कळ वर्षांपूर्वीं दोन मोठे भक्त येथें येऊन बाबाची कृपा संपादन करिते झाले. ते भक्त म्हणजे (१) उपासनीबुवा आणि (२) दासगणू. पहिल्याला बाबांनीं खंडोबाच्या देवळांत आणि दुसऱ्याला विठ्ठल मंदिरांत बसावयास लावून ध्यान, तपश्चर्या करण्यास सांगितलें. दोघांनाहि सिद्धि प्राप्त झाल्या. पहिल्यानें आपल्या सिद्धींच्या जोरावर पुष्कळ संपत्ति मिळवून साकोरी नगराची स्थापना केली. दुसऱ्याची कामगिरी अतिशय महत्त्वाची अशी झाली. त्यानें धनाचा परिग्रह न करितां वैराग्य-वृत्तीनें राहून काव्य—वाङ्मय यांचा सागर उत्पन्न केला वाढविला आणि आतां त्यांचे वय अजमासें ८७।८८ वर्षें असूनहि, तो वाढवीत आहेत. त्यांचे मानसपौत्र आयुर्विद्यापारंगत श्री. अनंतराव दामोदर आठवले यांनीं नुकताच 'संतकवि दासगणू महाराज—व्यक्ति आणि वाङ्मय' हा ग्रंथ लिहून व प्रसिद्ध करून दासगणूमहाराजांच्या काव्योदधीची यथार्थ कल्पना

जनतेला करून दिली आहे. त्यांत दिलेल्या ग्रंथाची नामावली पाहून वाचक थक्क व आश्चर्यचकित होईल, इतकी ती श्रेष्ठ व मोठी आहे. त्या नामावलीचा नुसता ओझरता उल्लेख वाचकांच्या माहितीसाठीं येथें करीत आहे. ग्रंथाच्या शेवटीं त्यांच्या काव्यसंग्रहाची माहिती येणें प्रमाणें दिली आहे.

(१) संतचरित्रात्मक ओवीबद्ध ग्रंथ–भक्तिलीलामृत, संतकथामृत, भक्तिसारामृत इत्यादि ११

(२) ओवीबद्ध ऐतिहासिक चरित्र (शिवछत्रीविजय अपूर्ण)—१

(३) ओवीबद्ध पौराणिक कथा ३

(४) ओवीबद्ध स्तोत्रें—१०

(५) ओवीबद्ध टीकाग्रंथ– ८

(६) ओवीबद्ध निवेदन प्रकरणें (कांहीं अपूर्ण)—२४

(७) श्लोकबद्ध अष्टकें व स्तोत्रें—३३

(८) खंडकाव्यें—२

(९) सुभाषितें

(१०) पोवाडे—१२

(११) प्रासंगिक स्फुट कविता—१७

(१२) आरत्या—१३

(१३) स्फुटपदें

(१४) भजनावली

(१५) कीर्तनोपयोगी व्याख्यानें—८२

ज्यांची बुद्धी तीव्र असेल आणि ज्यांची शक्ति अलोट असेल, त्यांनी या काव्योदधींत आलोडन करून सुखसंपन्न व्हावें. नाहींतर, इतरांनीं, डॉक्टर अनंतराव आठवले यांनीं ग्रंथाच्या शेवटीं, निवडक रत्नें (वेचे) काढून ठेविलेलीं आहेत. त्यांचा यथाशक्ति आस्वाद घ्यावा अशी सप्रेम सूचना करीत आहें.

आतां दासगणू महाराजांच्या **कीर्तन पद्धतीविषयीं** थोडेसें विवेचन करूं.

पुणें, नगर, सोलापूर या प्रांतात श्रीबाबांची ख्याति पसरलेली होती, पण कोंकणच्या (मुंबईच्या) बाजूस त्यांची माहिती, नानासाहेब चांदोरकर आणि दासगणू महाराज या दोघांनीं लोकांना करून दिली व त्यांना साईभक्ति लाविली. दासगणू हे पूर्वी पोलिस खात्यांत नोकर होते. ते उत्तम कवि असून तमाशांत लावण्या रचून देत असत. नानासाहेबांनीं त्यांना बाबांकडे नेलें. त्यांच्या घरीं दामोदर वामन आठवले ऊर्फ दामुअण्णा नांवाचा एक पोरका, पण गोड कंठाचा व सुस्वभावाचा मुलगा होता. त्याला त्यांनीं बाबाच्या आज्ञेप्रमाणें दासगणूकडे पाठवून दिलें. दामुअण्णाचें मराठी शिक्षण चांगलें झालें होतें. संस्कृताचाहि कांहीं थोडासा अभ्यास त्यांनीं केला होता. त्यामुळें दासगणूच्या कीर्तनाची साथ ते उत्तम करूं शकले, यामुळें दासगणू आणि दामुअण्णा ही जोडी – म्हणजे 'दुधांत साखर' किंवा 'सोन्याला सुगंध' असा प्रकार झाल्यामुळें त्यांची कीर्तनें लोकांना फारच आवडत असत आणि परिणामकारक होत असत.

## दासगणूंची नारदीय कीर्तन प्रथा

दासगणू एकदां शिरडीस असतां नीटनेटका पोषाख करून बाबांस भेटण्यास गेले. त्यांना वंदन केल्यावर 'नवरदेवासारखा सजून कुठें चाललास' असा श्री बाबांनीं प्रश्न केला. कीर्तन करावयास

जातों' म्हणून दासगणूनीं उत्तर दिलें. त्यावर बाबा म्हणाले–'अंगरखा फेटा कशास, किमर्थ केलास इतुका प्रयास' हा सर्व भार कशास अंगावर घ्यावा, तो सर्व खालीं काढून ठेव' तेव्हां त्यांच्या आज्ञेनुसार दासगणूंनीं सर्व पोषाख बाबाच्या चरणांवर ठेविला आणि तेव्हां-पासून 'तनु उघडी डोई न पगडी। कासेसी साधीच पंचे–जोडी' यांत सांगितल्या-प्रमाणें कीर्तन करण्याची प्रथा पाडली.

'तैंपासून उघडे सोज्ज्वल।
हातीं चिपळी गळां माळ
कीर्तन समयीं सर्व काळ।
गणूदास हावेळपर्यंत'॥ २७॥
• ही नारदीय मूळ गादी।
येथूनचि हरिदासांची मांदी।
बाह्य रंगाची न ज्यां उपाधी।
अंतःशुद्धिध्येय ज्यां॥

—श्रीसाईसच्चरित, अध्याय १५

याप्रमाणें नारदीय पद्धतीनें लोकांच्या विनंतीला मान देऊन दासगणू कीर्तन करूं लागले. 'एका कवडीचाहि परिग्रह। किंवा दुराग्रह तेथें ना' (अ–१५–१९) असा त्यांचा कीर्तनाचा बाणा असल्यामुळें श्रोत्यांची अतोनात गर्दी व अनिवार उडी कीर्तन प्रसंगीं नेहमीं होत असे. इतर ठिकठिकाणीं ते कीर्तनें करीत असत, तसेंच शिरडीस रामनवमी उत्सव १९१२ सालीं सुरू झाल्यावर चवथ्या वर्षापासून म्हणजे १९१६ सालापासून पुष्कळ वर्षें राम-नवमीच्या उत्सवांत या नारदीय पद्धतीनेंच कीर्तन करीत होते, अलीकडे कांहीं वर्षें हें काम दुसऱ्याकडे सोपविलें गेलें आहे.

आतां दासगणूच्या कीर्तनाचा नमुना कसा असे आणि श्रोत्यांवर काय परिणाम होत असे आणि त्यांना काय अनुभव येत असे याविषयीं एक नमुना किंवा मासला येथें देत आहें.

## चोळकराचा बिनसाखरी चहा आणि बाबांनीं या चहाची केलेली चहा

कोणत्याहि कीर्तन प्रसंगीं श्रोतृसमाज कसा असतो, आणि त्यांची आवडनिवड कशी असते हें बहुतेकांना माहीत आहे. कोणाला हरिदासबुवांची व्युत्पत्ति आवडते, तर कोणाला त्याचे हावभाव, कोणाला त्याचें प्रेमानें नाचणें, कोणाला कीर्तनाचा पूर्वरंग (वेदान्त निरूपण) तर कोणाला उत्तररंग (आख्यान किंवा कथा) आणि पुष्कळांना त्याच्या नकला आवडतात. 'ऐसे श्रोते बहुत असती। परी श्रवणें श्रद्धा भक्ति॥ जोडे ईश्वर वा संतचरणीं प्रीति। ही श्रोतृस्थिति दुर्मिळ' (अ. १५·४२), एकदां ठाण्याच्या लोकांनीं कौपिनेश्वर मंदिरांत दासगणूचें कीर्तन करविलें, नेहमींप्रमाणें तें कीर्तन 'सुश्राव्य' झालें. त्या प्रसंगीं ठाण्याच्या सिव्हिल कोर्टातील चोळकर नांवाचा एक गरीब उमेदवार उपस्थित होता. त्या कीर्तनांतील साईबाबाचें महिमान ऐकून चोळकर अत्यंत गहिंवरला. "आधींच चोळकर श्रद्धाळु। आला साईप्रेमाचा उमळु। मनांत म्हणती बाबा कृपाळु। करा सांभाळ दीनाचा'॥ (अ. १५ ४६). कोणी देवाला अनेक तऱ्हांचे नवस करितात आपली कामना पूर्ण झाल्यास, इच्छा-भोजन किंवा सहस्र भोजन घालूं, ब्राह्मण संतर्पण करूं शतगोदान देऊं किंवा अमुक रुपये देऊं असे अनेक नवस लोक करीत

असतात; पण चोळकर निर्धन, त्याचा गरिबीचा संसार, परीक्षा पास झाल्यास नोकरी कायम होणार, अशी त्याची स्थिति होती. तेव्हां त्यानें आम्हां गरीब लोकांसारखाच बाबांवर सर्व भार घालून असा नवस केला कीं.—

'झालों कृपेनें पास जर ।
होईन आपले पायीं सादर ॥
वांटीन नांवानें खडीसाखर ।
हाच निर्धार पैं माझा' ॥

—श्रीसाईसच्चरित अ. १५–५२

पुढें लवकरच देव (बाबा) त्याच्या नवसाला पावला. चोळकराची परीक्षा पास झाली आणि त्याला कायमची नोकरी लागली. पण पगार थोडा आणि कुटुंबखर्च फार, अशी स्थिति असल्यामुळें शिरडीस जाऊन नवस फेडण्याइतकी पुंजी त्याचेजवळ जमेना. असें म्हणतात कीं, नाणेघाट (ठाणें जिल्ह्यांतील मुरबाड तालुक्यांतील एक घाट) किंवा सह्याद्रीचा अफाट कडाहि ओलांडितां येईल. पण गरीबाला 'उंबरेघाट' (घराचा उंबरठा) ओलांडितां येत नाहीं. म्हणजे द्रव्याभावीं प्रवास करितां येत नाहीं. चोळकराची स्थिति अशीच झाली. त्याला आपलें घर व गांव सोडून जातां येईना. तेव्हां त्यानें काटकसर करण्याचें ठरविलें, आणि साखरेशिवाय चहा घेण्यास सुरवात केली. याप्रमाणें कांहीं दिवस गेल्यावर प्रवास खर्चाची रक्कम जमतांच, चोळकर शिरडीस गेला आणि त्यानें आपला नवस फेडला. बाबांचें दर्शन घेऊन त्यांचे पुढें श्रीफळ ठेवून त्यानें लोटांगण घातलें आणि निर्मळ मन करून खडीसाखर वांटली. आणि 'म्हणती आजी मनोरथ सकळ । झाले सफळ कीं माझे (अ. १५·५९) चोळकर जोगांचे पाहुणे होते. जोगही त्यावेळीं हजर होते. ते उठले आणि पाहुणे (चोळकर) जावयास निघाले. तेव्हां बाबा जोगांस म्हणाले—

**"पाजी यास चहाचे प्याले । भले भरले साखरेचे"** (अ. १५·६१)

'खुणेचीं अक्षरें पडतां कानीं । चोळकर चमत्कारले मनीं ॥ आनंदाश्रु आले नयनीं । माथा चरणीं ठेविला ॥ चहा नाहीं बाबांस ठावा ॥ येक्षणींच कां आठवावा ॥ चोळकरांचा विश्वास पटावा । ठसा उमटावा भक्तीचा ॥ —(अ. १५–६२–६४)

बाबांनीं त्याला या योगें असा इषारा किंवा समज दिली कीं, तुझी वाचादत्त (नवसाची) साखर मला पोचली. तुझा त्यागाचा नियमही पुरा झाला, दीर्घसूत्रतेचें (नवस लवकर न फेडण्याचें) प्रायश्चित्त (साखरेशिवाय चहा) तूं जरी गुप्त ठेविलें होतेंस तरी तें सर्व मला कळलें, तुम्हीं कुठेंही असा, माझ्या पुढें भावानें पसा पसरतांच मी तुमच्या हृदयीं, अंतर्यामीं आहे असें समजा. बाबांचें हें सर्वसाक्षित्व व अंतर्ज्ञान खरोखर अलौकिक होय यांत शंका नाहीं आणि दासगणूच्या कीर्तनामुळें हें चोळकरांना पटलें.

## दासगणू महाराजांचें बाबांविषयीं अनुभवकथन

दासगणू महाराज हे अद्याप हयात आहेत. श्रीकृपेनें ते शतायु–चिरायु होवोत आणि त्यांच्या हातून उत्तरोत्तर उत्कृष्ट वाङ्मय उत्पन्न होवो अशी आमची अपेक्षा आणि प्रभुपाशीं प्रार्थना आहे.

नुकतेच कैलासवासी झालेले, सॅलेम-मद्रासचे बाबांचे सुप्रसिद्ध भक्त श्री. बी. व्ही. नरसिंहस्वामी यांनीं इतरांबरोबर दासगणूमहाराज यांचा बाबाविषयीं अनुभव लिहून घेतला आहे आणि तो 'भक्तानुभव'-भाग २ या आपल्या इंग्रजी ग्रंथांत प्रसिद्ध केला आहे. तो देण्यापूर्वी दासगणूमहाराजाचें पूर्ववृत्त वाचकांच्या माहितीसाठीं थोडक्यांत देत आहें.

दासगणू महाराजांचे पणजोबा अप्पाजी नारायण सहस्रबुद्धे; त्यांना झालेल्या पांच मुलांपैकीं चवथे एकनाथ हे त्यांचे आजोबा. एकनाथाच्या चार मुलांपैकी वडील मुलगा दत्तात्रेय हे त्यांचे वडील. दासगणूचा जन्म शके १७८९, पौष शुद्ध एकादशीस अकोळनेरगांवीं झाला. त्याचें पाळण्यांतील नांव 'नारायण' असें ठेविलें. पण मुलाला मांडीवर घेऊन पहातांना आजोबा एकनाथपंत म्हणाले—नारायण नांव कां ठेविलें? गुलामाचें पोट पहाना! कसें गणपतीसारखें आहे. कानसुद्धां पहा केवढे आहेत. याला आतां गणपतीच म्हणावयाचें. आजोबांची ही सूचना सर्वांना मान्य झाली आणि गणपति—गणेश हेंच नांव प्रचलित झालें. गणेश हें बुद्धिमत्तेचें परम मंगल दैवत आणि त्याप्रमाणें दासगणूचें नांवहि अन्वर्थक झालें हें त्यांच्या पुढील चरित्रावरून स्पष्ट झालें.

सात वर्षें झाली तरी त्यांचें शिक्षण सुरू झालें नाहीं. नवव्या वर्षी नगर येथें त्यांची मुंज झाली. त्यानंतर त्यांचें शिक्षण


**For clean and delicious egetarian food—**

Please visit:—

**NATIONAL HINDU RESTAURANT**

Graham Road, Ballard Estate, Bombay

**स्वच्छ व रुचकर शाकाहारी जेवणाकरितां**

# नॅशनल हिंदु रेस्टारंटला

**भेट द्या**

**( ग्रॅहम रोड, बेलार्ड ईस्टेट, मुंबई )**

कसेंबसें थोडेसें झालें. त्यांचे चुलते जनार्दनपंत यांनीं त्यांच्या इंग्रजी शिक्षणाविषयीं फार खटपट केली. तेराव्या वर्षी ते इंग्रजी तिसरींत होते आणि चवदाव्या वर्षी इंग्रजी चवथींत गेले आणि त्यानंतर त्यांचें शिक्षण बंद पडलें. शके १८१३ मध्यें जामखेड तालुक्यांतील बोरले अष्टयाचे जहागीरदार नारायणराव रानडे यांच्या कन्येशी दासगणूंचा विवाह पुणें येथें झाला. त्यानंतर ते नगरास आल्यावर भटकण्याचा, नोकरी किंवा उद्योगधंदा कांहीं न करितां चकाट्या पिटीत उगाच भटकण्याचा त्यांचा क्रम सुरू झाला हें त्यांच्या चुलतीना न आवडून ती त्यांना मर्मभेदक असें टोंचून बोलली. ते त्यांना न आवडल्यामुळें त्यांनीं घराचा त्याग केला आणि ते नगरच्या रस्त्यावरून हिंडत असतांना पोलिस सुपरिंटेंडेंट एम्. केनडी यांची गांठ पडली आणि त्यांनी दासगणूला पोलिसखात्यांत नोकरी दिली आणि दरम हा नऊ रुपयांवर शिपाई नेमिलें.

या खात्यांत काम करीत असतां त्यांच्या कवित्वशक्तीचा विकास झाला; आणि ते तमाशाकरितां पोवाडे, लावण्या वगैरे रचूं लागले आणि ते पुष्कळांना आवडले. या खात्यांत काम करीत असतांनाच त्यांना सद्गुरूपदेश झाला. इस्लामपूरचे राहाणारे श्री. वामन शास्त्री इस्लामपूरकर नांवाचे एक विद्वान् गृहस्थ, रामदासी सांप्रदायी असूनहि पंढरीचे वारकरी असे होते. त्यांना कांहीं सरकारी कामांत दासगणूंनी श्री गोंद्यास जाऊन मदत करावी म्हणून वरिष्ठांकडून लिहून आल्यामुळें दासगणू त्यांच्या तैनातीस राहिले. त्यांची वागणूक, सुस्वभाव वगैरे पाहून दासगणूंना फार आनंद झाला आणि त्यांनी त्यांचेपासून रीतसर मंत्रोपदेश घेतला. दासगणू हे कट्टर शिवभक्त असल्यामुळें त्यांनी बेलाच्या पानावरच शिवमंत्राचा उपदेश घेतला. गुरूच्या आज्ञेमुळें पंढरीची वारी पत्करली. पुढें कांहीं वर्षानंतर काशीस देह ठेवण्यासाठीं ते निघाले तेव्हां त्यांनी दासगणूला बोलावून घेतलें आणि भुसावळवरून प्रवास करितांना आपलें आध्यात्मिक सर्वस्व दासगणूंना दिलें आणि परत जातांना त्यांना सांगितलें कीं, हा मृत्युलोकच आहे, वेड्यासारखें दुःख करूं नकोस, साईबाबा योग्य विभूति आहेत, आम्हीं दोघे एकरूपच आहोंत. तेच तुला वेळोवेळीं मार्ग दाखवितील. पुढें नानासाहेबांच्या आग्रहामुळें दासगणू साईबाबांच्या भेटीस गेले.

श्री. वामनशास्त्री यांना संतति नव्हती आणि दुसरा शिष्यहि नव्हता. तेव्हां त्यांनी आपली सर्व मिळकत एका मृत्युपत्रानें दासगणूला दिली. पण हें गुरुपत्नीला आवडलें नाहीं, कांहीं मित्रांनी सल्ला दिला तरी दासगणूंनी तें मृत्युपत्र जसेंच्या तसें गुरुपत्नीच्या स्वाधीन केलें. खरें वैराग्य तें हेंच आणि ही विरक्तवृत्ति अद्यापि दासगणूंच्या अंगीं बाणत आहे.

## पोलिसखात्यांत नोकरी

शके १८१४ ते १८२५ या अकरा वर्षांच्या कालाकडे पाहतां दासगणूंनीं श्रीगोंद्यास नोकरीचा आरंभ केला. मध्यांतील काळ जामखेडास घालविला आणि शेवटीं दोन तीन वर्षें नेवाशास काढलीं असें दिसतें. ही नोकरी करीत असतां

कान्ह्या भिल प्रकरण कसें उद्भवलें आणि त्यांना नोकरीचा कसा त्याग करावा लागला इत्यादि हकीगत पुढें येणार आहे.

## दासगणू महाराजांचें अनुभव कथन

जून १९३६ पुणें

दासगणू महाराज ऊर्फ

गणपतराव दत्तात्रेय सहस्त्रबुद्धे

ब्राह्मण, कीर्तनकार, वय अजमासें ६८

राहणार नांदेड, निजाम स्टेट

यांचें कथन असें कीं :—

मी श्रीसाईबाबांना बऱ्याच वर्षांपासून ओळखतों, त्यांची कांहीं हकीकत मी माझ्या ग्रंथांत (१) भक्तिसारामृत, अध्याय २६, ६५, ६६, ६७ (१९२५) (२) भक्ति लीलामृत, अध्याय ३१ (१९०६) आणि अध्याय ३२ व ३३ आणि संतकथामृत, अ. ५७ यांत दिली आहे. यांपैकीं दुसऱ्या ग्रंथाचा अध्याय ३१, आणि तिसऱ्या ग्रंथाचा अध्याय ५७ हे बाबांच्या हयातींतच प्रसिद्ध झाले होते.

बाबांच्या चरित्रांतील त्यांच्या कांहीं आठवणी व गोष्टी त्यांच्या मुखांतूनच आल्या आहेत. पण त्या फार थोड्या, शिवाय माझा बाबांबरोबर फार काळ गेला नाहीं, माझी त्यांची क्वचितच भेट होई, मी शिरडीस असतांना बाबा मला फार वेळ मशिर्दींत रहाणेस देत नसत, ते मला विठ्ठल मंदिरांत जाणेस सांगत. तेथें राहून मी संतचरित्रें आणि वर नमूद


*FOR VEGETARIAN MEALS AND COFFEE MADRAS TYPE*

*Visit:*

**CAFE MADRAS**

Prop.- R. D. SHETTY

22, MANGALORE STREET,
BOMBAY 1.

कलेले ग्रंथ लिहीत असें आणि विष्णु सहस्रनामाचें पारायण करीत असे. वर नमूद केलेले ग्रंथ लिहण्याचे पूर्वी बाबां-विषयीं मी कांहीं चौकशी केली होती आणि कांहीं गोष्टी मला स्वतः माहीत होत्या. मी पोलीसखात्यांत हवालदाराच्या जागेवर होतों. तरी वाङ्मयाकडे आणि नाटकाकडे माझा विशेष कल होता. मला तमाशाचा फार नाद असून मी त्यांत भाग घेत असें. लावण्या व इतर छंदांत तात्काळ स्फूर्तीनें कविता करीत असें. मी नोकरींत असतांना आणि नाना-साहेब चांदोरकर हे कलेक्टरचे चिटणीस व डेप्युटी कलेक्टर असतांना त्यांनीं मला साईबाबाकडे नेलें. अगदीं प्रथमपासूनच बाबानीं माझं भविष्य जाणलें, आणि माझी नोकरी, माझे छंद व मार्ग यांपासून परावृत्त करून माझें रक्षण करण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. माझ्या समक्ष त्यांनीं नानासाहेबाना सांगितलें कीं,–'**या मनुष्यास तमाशाचा छंद आणि आपल्या नोकरीचा नाद आहे. त्यानें हें सर्व सोडून** द्यावें. नाना-साहेबांना व मलाहि तेंच सांगितलें.

पण मला माझे छंद ( तमाशा वगैरे ) व नोकरीहि आवडत असत. हलुहलू मी तमाशांत भाग घेण्याचें बंद केलें. पण नोकरी मला सोडतां येईना. प्रत्येक वेळीं नोकरी सोडून देण्याचा उपदेश करण्यांत येई. तेव्हां 'मी पाहतों, विचार करतों' असें मी उत्तर देई. तेव्हां बाबांनीं सांगि-तलें कीं, नोकरी सोडण्यास भाग पाडल्या-शिवाय म्हणजे याचेवर कठीण प्रसंग ओढवल्याशिवाय हा कांहीं नोकरी सोडणार नाहीं. याप्रमाण सतत दहा वर्षें मी नोकरी सोडून द्यावी म्हणून बाबांनीं एकसारखा माझ्यामागें प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष लकडा लाविला. पुढें माझेवर एकामागून एक असे कठीण प्रसंग कसे कसे येत गेले आणि त्या सर्वांतून शिक्षा, अपमान, हाल इत्यादिकांपासून बाबाच्या कृपेनें माझी सुटका कशी झाली आणि शेवटीं १९०३ सालीं मला नोकरी कशी सोडावी लागली हे मी पुढें सांगणार आहें.

## बाबांची कमिशनवर साक्ष

बाबांची एकदां साक्ष झाली. त्यावेळीं बाबांच्या पूर्वाश्रमांतील कांहीं गोष्टी उघडकीस आल्या, त्याविषयीं मी प्रथम सांगतों. धुळ्याच्या तहसीलदार मॅजिस्ट्रेट कोर्टांत एका इसमावर चोरीच्या आरोपा-वरून कज्जा चालला होता. त्या आरोपीनें, शिरडीच्या साईबाबानें मला हें जवाहीर ( चोरीचा माल ) दिलेलें आहे असें सांगून बाबांची साक्ष काढली. त्याप्रमाणें बाबांना समन्स आलें. बाबानीं तें घेण्याचें नाकारलें, इतकेंच नव्हे तर धुनींत ( आगींत ) फेकून दिलें. बाबांवर समन्स लागू झालें आहे, असा बेलिफाकडून रिपोर्ट गेला. पण बाबा कांहीं धुळयास गेले नाहींत. त्यावर धुळें कोर्टानें बाबांवर वारंट काढिलें. कोपरगांवचा चीफ कान्स्टेबल गणपत रामजी तें वारंट घेऊन आला. आणि त्यांतील मजकूर बाबांस सांगून माझेबरोबर धुळयास चला अशी विनंति करूं लागला. बाबाना पकडून नेण्याचें त्याला कांहीं धैर्य होईना. बाबा त्याला कांहीं दाद देईनात. ते रागा-वून शिव्या देऊं लागले, आणि तें वारंट मसणांत फेंकून दे असें त्याला सांगूं लागले. कॉन्स्टेबल घोटाळ्यांत पडला.

त्यावेळीं मी तेथें होतों. नगरचे डेप्युटी कलेटर बाबाचे भक्त नानासाहेब चांदोरकर यांचा या कामीं सल्ला घ्यावा असें मी त्याला सांगितलें. त्या प्रमाण त्यांचा सल्ला विचारण्यांत आल्यावर त्यांनीं असें सांगितलें कीं, साईबाबा व त्यांचे भक्त यांना बाबांना धुळ्यास साक्षीस जावें हें आवडत नसेल तर, साईबाबा हे एक अलौकिक पुरुष आहेत. त्यांचे अनेक भक्त त्यांना ईश्वर मानतात, त्यांचेवर इतर सामान्य लोकांप्रमाणें कोर्टाची प्रोसेस (समन्स, वारंट वगैरे) लागू करणें हें गैर व अनिष्ट होईल, त्याकरितां त्यांची साक्ष शिरडींतच कमिशनवर व्हावी असा एक विशेष अर्ज तयार करून त्यावर पुष्कळ लोकांच्या सह्या घेऊन तो धुळ्यास पाठवावा. त्याप्रमाणें अर्ज पाठविण्यांत आला. तेव्हां कोर्टानें शिरडीस एक कमिशन पाठविलें. नाना जोशी नांवाचे फर्स्ट क्लास मॅजिस्ट्रेट असिस्टंट कलेक्टर हे बाबाची साक्ष घेण्यास शिरडीस आले. ते येण्यापूर्वी तीन तास बाबांनीं एक टेबल व कांहीं खुर्च्या मागवून मशिदींत एक इंगामी कोर्ट तयार केलें. पुढें कमिशनर (नाना जोशी) आले आणि बाबांची साक्ष घेऊं लागले. ही अपूर्व व लोकात्तर साक्ष येणेंप्रमाण—

कमिशनर : आपलें नांव काय ?

बाबा : मला साईबाबा म्हणतात.

क : आपल्या वडिलाचें नांव काय ?

बा : साईबाबाच.

क : आपल्या गुरूच नांव काय ?

बा : वेंकुसा ( वेंकुशहा )

क : आपला पंथ किंवा धर्म ?

बा : कबीर

क : जात किंवा वंश ?

बा : परवरदिगर (अल्ला किंवा ईश्वर)

क : कृपा करून आपलें वय सांगा.

बा : लाखों वर्षें.

क : आपण जें कांहीं सांगतां, तें सत्य आहे असें आपण शपथपूर्वक प्रतिज्ञेवर सांगाल काय ?

बाबा : सत्य.

क : अमुक आरोपी आपणांस माहीत आहे काय ?

बा : मी त्याला आणि प्रत्येकाला जाणतों.

क : तो आरोपी सांगतो कीं, तो आपला भक्त असून आपलेपाशीं राहत होता हें खरें आहे काय ?

बा : होय. मी प्रत्येकाबरोबर राहतों. सर्वजण माझेच आहेत.

क : त्यानें सांगितल्याप्रमाणें आपण त्याला जवाहिर दिलें काय ?

बा : होय—कोण काय कोणाला देतो ?

क : जर आपण त्याला जवाहीर दिलें, तर तें आपणांस कसें मिळालें आणि आपल्यापाशीं कसें आलें ?

बा : प्रत्येक वस्तु माझीच आहे.

क : बाबा, त्याचेवर चोरीचा मोठा आरोप आहे, तो सांगतो कीं, तें जवाहीर आपण त्याला दिलें.

बा : हें सर्व तुम्ही काय मांडलें आहे. या सर्वांचा माझेशीं काय संबंध आहे ?

अशा उत्तरांनीं कमिशनर थक्क झाले व थकले. पुढें काय लिहून घ्यावें हें त्यांना सुचेना. बाबा प्रत्येक प्रश्नाला होय म्हणून उत्तर देऊं लागले. तेव्हां अशी एक तडजोड सुचविणेंत आली कीं, शिरडी ग्रामाची

डायरी मागवावी. कारण त्या डायरींत बाहेरचा कोण मनुष्य आला व तो किती दिवस गांवांत राहिला याची नोंद असते. चोरी झाली त्या सुमारास आरोपी शिरडींत आला होता किंवा नाहीं हें त्या डायरीवरून समजेल आणि त्यावेळीं त्याचें नांव डायरींत नसेल तर ती गोष्ट नमूद करून ठेवावी. त्याप्रमाणें ती ग्राम—डायरी आणविली आणि ती पाहतां आरोपी किंवा तत्सम कोणीहि शिरडी गांवांत आला नाहीं असें आढळून आलें. बाबा तर शिरडी किंवा त्या गांवचा आसपास भाग सोडून बाहेर कधीं जात नसत हें सर्वविश्रुत होतें. तेव्हां कमिशनरनीं बाबांना प्रश्न केला कीं, चोरीच्या वेळीं आरोपी शिरडींत बाबापाशीं नव्हता; आणि बाबांनीं त्याला जवाहीर दिलें नाहीं. बाबांनीं सांगितलें कीं, होय तसेंच! बाबांचें हें शेवटचेंच उत्तर. झालें, बाबांची साक्ष संपली. सही करणेस किंवा अंगठा लावणेस त्यांना सांगितलें नाहीं. कमिशनवर झालेला जबाब धुळ्यास पाठविणेंत आला आणि आरोपीवर गुन्हा शाबीत होऊन त्याला शिक्षा झाली.

बाबांचें वय किती होतें " ठरवितां येत नाहीं. तसेंच त्यांची जात, त्यांचे आईबाप याविषयीं हि कांहीं नक्की सांगतां येत नाहीं. ४० वर्षांपूर्वी अजमासें ६५ अथवा ७० वर्षें वयाची एक वृद्ध बाई साळुबाई शेलके मला भेटली होती. तिनें मला सांगितलें कीं, ८ किंवा ९ व्या वर्षी जेव्हां माझें लग्न झालें तेव्हां बाबा शिरडींस आलें आणि त्यावेळीं ते, आतां (१८९५) जसें ४०।५० वर्षांचे दिसले तसें दिसत होते. दुसरी एक वृद्ध बाई सईबाई म्हणाली कीं, जेव्हां बाबा शिरडीस आले तेव्हां ते लहान मुलाप्रमाणें दिसत होतें. यावरून बाबाचें वय त्यांचे समाधीच्या वेळीं शंभरावर असावें असें वाटतें आपलें वय किती हें, आणि पूर्वाश्रमाची विशेष माहिती बाबाना विचारणेस कोणाचीहि छाती होत नसे. तेव्हां याविषयीं नक्की असें कांहीं सांगतां येत नाहीं.

पण बाबा केव्हां केव्हां स्वतःच आपली पूर्वीची हकीकत सांगत असत. आपल्या गुरु विषयीं त्यांनीं पुष्कळदां सांगितलें कीं, (संतकथामृत ५७-२४) व्यंकुशाहा हे आपले गुरु होते आणि त्यांच्याच कृपेनें हें हल्लींचें पद (स्थिति) प्राप्त झालें आहे.

त्यांचेविषयीं पुष्कळ गोष्टी अतर्क्य व गूढ असत. त्यांचे कांहीं चमत्कार मी स्वतः पाहिले आहेत व कांहीं दुसऱ्याकडून ऐकिलेले आहेत. (१) बाबांनीं मशिदींतील पणत्या तेला ऐवजीं पाणी घालून (किंवा पाण्याचें तेल करून) सबंध रात्रभर पेटत ठेविल्या ही गोष्ट प्रत्यक्ष पाहिलेल्या खेडुतांनीं मला सांगितली आहे. त्या दिवशीं बाबाना तेल देण्यास ज्यांनी नकार दिला त्यापैकीं प्रेमचंद मारवाडी हे एक होते. (२) मशिदींत छपरास फाटक्या चिंध्यांनीं बांधून टांगलेली 'बाबांची विचित्र शय्या' म्हणजे एक वीत रुंद आणि चार हात लांब अशी लांकडाची फळी मी स्वतः पाहिलेली आहे. जमिनीपासून सात आठ हात उंच वर, व आढ्यापासून हात दीड हात खालीं टांगलेल्या फळीवर बाबा कसे चढत व उतरत असत हें एक मोठें आश्चर्यच होय. त्या फळीवर चोहोंबाजूस चार पणत्या पेटलेल्या असत. बाबा तेथें कसे चढतात

व तेथून ते कसे उतरतात आणि ती फळी त्यांचा भार कसा सहन करिते हें पाहणेचा पुष्कळांनीं प्रयत्न केला. पण यांत कोणालाहि यश आलें नाहीं. ( ३ ) भक्तलीलामृत, अध्याय ३१, ओंव्या १२२ ते १४३ यांत सांगितलेली नारायण कृष्ण पेणशे यांची हकीकत—म्हणजे पेणशांची कांता परम भाविक व उदार मनाची अशी होती. तिला बाबाचें दर्शन सहज झालें, पण शिरडींत एक वेडापिसा मुसलमान ढोंग माजवून जग लुटाया बैसला आहे असें म्हणणाऱ्या पेणशांना बाबानीं सहज दर्शन दिलें नाहीं, उलट हातीं घोंडा घेऊन मारण्यास तयार झाले. तेव्हां आपाचा वशिला लावून त्यांनीं बाबाचें दर्शन घेतलें इत्यादि—मी सदर पेणशाकडूनच ऐकिलेली आहे.

बाबासमोर भक्तलीलामृत (अध्याय ३१, ३२, ३३) हा ग्रंथ पोथीसारखावाचून दाखविण्यांत आला. तेव्हां नाना साहेब चांदोरकरांनीं सदरहु ग्रंथ बाबांच्या हातीं दिल्याबरोबर बाबा उद्गारले कीं, हा ग्रंथ ठीक आहे.

मुसलमानाप्रमाणें दिवसा पांच तर सोडून द्या, बाबा एकदांसुद्धां नमाज पढत नसत. फतिआ म्हणावयाचा असला म्हणजे तो कोणाकडून तरी म्हणवून घेत व केंव्हां केंव्हां ते स्वतःहि म्हणत असत, तसेंच कुराणांतील कांहीं भागहि म्हणत असत.

बाबांनीं नानासाहेब चांदोरकरांना जो कांहीं उपदेश सांगितला, तो त्यांनीं मला सांगितला. त्याला मी नीटनेटकें रूप देऊन (भक्त लीलामृत अध्याय ३३) प्रसिद्ध केला. त्यांतील मुख्य भाग नानासाहेबांनीं मला दिला (सांगितला) आहे. बाबांनीं माझे समक्ष अद्वैताचें निरूपण केलें आहे. 'अहं ब्रह्मास्मि, तत्त्वमसि; सर्वं खल्विदं ब्रह्म' हीं महावाक्यें बाबांनीं पुष्कळदां उच्चारलेलीं आहेत. बाबांना अवगत नाहीं असें कांहींच नाहीं.

**स्थापना : विजयादशमी १९४२**

**— सुवर्ण संधि —**

ज्यांच्या ठिकाणीं आत्मविश्वास असतो, त्यांचं जीवन नेहमीं जगण्यासारखं असतं. पण केव्हां? जीवनांतील खाचखळग्यांची पूर्वसूचना मिळून योग्य मार्गदर्शन होईल तेव्हां! माफक खर्चांत योग्य सल्ला व अचूक मार्गदर्शन आगाऊ सूचनेनुसार भेटा.

# जी. एम्. भिवणकर

**हस्तसामुद्रिक व ज्योतिषी**

प्लॉट नंबर ३७४, आऊट हाऊस, १ ला रस्ता, पॉवर हाऊसजवळ, खार मुंबई २१
भेटण्याच्या वेळा : शनिवारीं ३ ते ५-३० पर्यंत व रविवारीं नि बँकेला सुटी असेल त्या दिवशीं सकाळीं ९ ते १२ व दुपारीं ३-३० ते ५-३० पर्यंत.
आगाऊ भेटीसाठीं पत्रव्यवहार करावयाचा असल्यास मंगळवारपर्यंत करावा.